# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२६

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**सोमवार, दिनांक ०६ जुलै, २०२६ / आषाढ १५, १९४८ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) महसूल मंत्री**<br>**(२) वने मंत्री**<br>**(३) आदिवासी विकास मंत्री**<br>**(४) कृषी मंत्री**<br>**(५) सामाजिक न्याय मंत्री**<br>**(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री**<br>**(७) मदत व पुनर्वसन मंत्री**<br>**(८) मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यांतर्गत येणाऱ्या १२ गावांचे पुनर्वसन प्रलंबित असल्याबाबत

**(१) * ९१५२ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरेड-पवनी-कऱ्हांडला (ता.पवनी, जि.भंडारा) अभयारण्यांतर्गत येणाऱ्या १२ गावांचे पुनर्वसन दीर्घकाळापासून प्रलंबित असल्याने व योग्य मोबदला न मिळाल्यामुळे गावकऱ्यांनी वन विभागाच्या कार्यालयासमोर साखळी उपोषणाचा इशारा दिला असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जुलै, २०१२ आणि सन २०२३ च्या अधिसूचनेनंतरही पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे या १२ गावांमध्ये प्राथमिक सुविधांचा अभाव असून, प्रशासकीय दिरंगाईमुळे नियमांचे उल्लंघन होत असल्याने पुनर्वसन आणि योग्य मोबदला न मिळाल्यामुळे या भागातील शेतकरी व बेरोजगार युवकांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून त्यांचे जीवनमान पूर्णतः विस्कळीत झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तसेच सदर बाधित गावकऱ्यांना सुधारित आर्थिक पॅकेज देणे, प्रलंबित असलेले ‘प्रकल्पग्रस्त दाखले’ त्वरित वितरित करणे आणि पात्र उमेदवारांना शासकीय नोकरीमध्ये प्राधान्य देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१), (२) व (३) दिनांक ०१/०४/२०२६ रोजी उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्य अन्यायग्रस्तांनी कृती समितीद्वारे न्याय हक्क विविध मागण्यांसाठी साखळी उपोषणाचा इशारा दिला होता, ही वस्तुस्थिती आहे.

उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्य क्षेत्रांतर्गत शासन राजपत्र दिनांक २९/०६/२०१२ व दिनांक ०४/०७/२०२३ अन्वये उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यलगत असलेल्या एकूण १२ गावांकरीता अधिसूचना निर्गमित झालेली आहे.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी कळविल्यानुसार उपरोक्त प्रकरणांतर्गत महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ कलम ११ ची अधिसूचना प्रसिद्ध झाली नसून, त्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

तसेच सदर गावांच्या पुनर्वसनाबाबत गठीत पुनर्वसन समितीमार्फत जमिनीच्या मूल्यांकनाबाबत कार्यवाही सुरू आहे. तसेच क्षेत्रीय स्तरावरील सदर गावांमधील खाजगी शेती, वनझाडे, विहीर व इतर स्थावर मालमत्तेची नोंद घेणेकरीता गाव पातळीवर समिती गठीत करण्यात असून, अनुषंगिक कामे सुरु आहेत. महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ०३/११/२०१२ व १२/१०/२०१५ अन्वये पुनर्वसन धोरणानुसार क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

सदर प्रकरणी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार पुनर्वसनाची प्रक्रिया जलद गतीने करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे पुरनाड (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथे अवैध उत्खनन प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(२)** * **९५०० श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पुरनाड (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील गट क्र.१९६ मध्ये तसेच पुरनाड फाट्याकडून कुऱ्हा परिसराकडे जाणाऱ्या मार्गावरील टेकडीचे मोठ्या प्रमाणावर अवैध उत्खनन झाले असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ४ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान अपर मुख्य सचिव, महसूल विभाग यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतजमीन सपाटीकरण किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव उत्खननाची कोणतीही रीतसर परवानगी न घेता, विनापरवाना गौण खनिजाचे उत्खनन व वाहतूक करून शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच चौकशीच्या अनुषंगाने अनधिकृत उत्खननास जबाबदार असलेले संबंधित जमीन मालक, कंत्राटदार आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांवर 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता' आणि 'गौण खनिज उत्खनन नियमावली' नुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सन्माननीय सदस्य श्री.एकनाथराव खडसे यांनी जिल्हाधिकारी जळगाव कार्यालयाकडे दिनांक ४ एप्रिल, २०२६ रोजीच्या पत्रान्वये तक्रार दाखल केली आहे.

(२) व (३) मौजे पुरनाड, ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव येथील पुरनाड फाटा कडून कुऱ्हा परिसराकडे जाणाऱ्या मार्गावरील खाजगी नं. १९६ मध्ये जमिनीचे सपाटीकरण करण्यात आलेले आहे.

बऱ्हाणपूर (मध्यप्रदेश) ते मुक्ताईनगर या राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून नियुक्त केलेले कंत्राटदार बी.एन.ए. इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लि. यांना मुक्ताईनगर तालुक्यातील पुरनाड या गावासह अन्य गावांमधून मुरूम उत्खननासाठी परवाने देण्यात आले होते. कंत्राटदाराने एप्रिल, २०२६ पर्यंत, महामार्गाच्या कामासाठी २६,४५० ब्रास गौणखनिजासाठी रक्कम रुपये १,५८,७०,०००/- स्वामित्वधन रकमेचा भरणा केला होता. तथापि, कंत्राटदाराने या कामासाठी वापरलेले गौणखनिज ४८,४९८ ब्रास व भरणा केलेली स्वामित्वधनाची रक्कम यामध्ये तफावत असल्याने उर्वरित २२,०४८ ब्रास मुरूम गौणखनिजासाठी स्वामित्वधन रक्कम भरणा करण्यासाठी, कंत्राटदार यांना शासन परिपत्रक महसूल व वन विभाग दिनांक ९ ऑक्टोबर, २०२४ मधील तरतूदीनुसार दिनांक २७ एप्रिल, २०२६ रोजी नोटीस देऊन त्यानुसार संबंधित कंत्राटदाराने दिनांक २६ मे, २०२६ रोजी १,३४,००,०००/- इतक्या रकमेचा भरणा केला आहे.

याव्यतिरिक्त कंत्राटदाराने राष्ट्रीय महामार्ग ७५३L या कामासाठी मुक्ताईनगर येथील परवाना दिलेल्या गट नं. ७१४/५ व्यतिरिक्त अन्य गटामध्ये २० ब्रास अतिरिक्त उत्खनन केल्याचे आढळून आल्यामुळे दिनांक ०७ एप्रिल, २०२६ रोजी रक्कम रुपये १२,०००/- स्वामित्वधन रकमेचा भरणा करून घेण्यात आला आहे.

कंत्राटदार बी.एन.ए. इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड यांचे चार डंपर राष्ट्रीय महामार्ग ७५३L या कामकाजासाठी दिनांक २१ मे, २०२५ रोजी ३२ ब्रास मुरूम विनापरवाना वाहतूक करताना आढळून आल्यामुळे या वाहनांविरुद्ध कारवाई करण्यात आली असून दंडात्मक रक्कम रुपये ११,८१,४४० दिनांक २८ ऑगस्ट, २०२५ रोजी भरणा करून घेण्यात आली आहे.

राष्ट्रीय महामार्ग कामासाठी अतिरिक्त उत्खननापोटी तफावतीची रक्कम भरून घेण्यात आली असून त्यानंतर उत्खनन झाले असल्यास ईटीएस मोजणी करून तफावतीची रक्कम / स्वामित्वधन, व इतर दंडात्मक रकमा भरून घेणेबाबत तहसीलदार मुक्ताईनगर यांना जिल्हाधिकारी, जळगाव यांनी निर्देश दिले आहेत. तसेच दिनांक २७/०५/२०२६ अन्वये तहसीलदार मुक्ताईनगर यांनी ईटीएस मोजणी करणेबाबत उपसंचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना कळविले आहे. तसेच कंत्राटदार बी.एन.ए. इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड यांना विनापरवाना उत्खनन करू नये, याबाबत लेखी निर्देश दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकणातील आंबा व काजू उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत आल्याबाबत

**(३) * ९३२९ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके, श्री.हेमंत पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण विभागातील विशेषत: रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसह राज्यातील विविध भागांमध्ये वातावरणातील बदल, युद्धजन्य जागतिक परिस्थिती, निकृष्ट व बनावट खते, कीटकनाशके व तणनाशकांच्या विक्रीमुळे आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घटल्याने आर्थिक नुकसान झाल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकण विभागात आंबा व काजू उत्पादनात ८० ते ९० टक्क्यांपर्यंत घट झाली असून आखाती युद्ध परिस्थितीमुळे आंबा निर्यात घटल्याने व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत, तसेच रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात सुमारे ३५० कोटी रुपयांची बनावट व निकृष्ट दर्जाची खते, कृषी औषधे, तणनाशके व कीटकनाशके विक्री होत असल्याबाबत कृषी विभागाकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने काजू व आंबा उत्पादक शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देऊन फळविक्रीसाठी बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली तसेच निकृष्ट खते व कीटकनाशके देऊन शेतकऱ्यांना फसविणाऱ्या औषध कंपन्यांवर गुन्हा दाखल करण्याबाबत तसेच युरिया किंवा डीएपीसारख्या अनुदानित खतांच्या विक्रीवेळी शेतकऱ्यांना इतर दुय्यम खते, औषधे किंवा उत्पादने सक्तीने खरेदी करण्यास भाग पाडणाऱ्या संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) व (२) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली व कृषी विभागाच्या संयुक्त क्षेत्रीय पाहणी मध्ये सदरील नुकसान हे तापमानवाढ, हवेतील आर्द्रता व कडाक्याची थंडी या बदलत्या हवामानामुळे ओढवलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच बनावट व निकृष्ट दर्जाची खते, कृषी औषधे, तणनाशके व कीटकनाशके विक्री होत असल्याबाबत निदर्शनास आले नाही.

(३) कोकण विभागात हवामान बदलामुळे आंबा व काजू पिकातील झालेल्या नुकसानीबाबत शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी शासनामार्फत NDRF च्या निकषानुसार पंचनामे करण्याचे आदेश देण्यात देण्यात आले असून त्यानुसार कोकण विभागात आंबा पिकाचे व काजू पिकाचे ९२३४२.७८ हेक्टर बाधित क्षेत्राचे पंचनामे पूर्ण झाले असून त्याचा अहवाल सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

राज्यात ८७९ कृषी निविष्ठा गुणनियंत्रण निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तरावर भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. त्यांचेद्वारे कृषी सेवा केंद्रांची व निविष्ठांच्या नमून्यांची नियमितपणे तपासणी करण्यात येते.

युरिया किंवा डीएपीसारख्या अनुदानित खतांच्या विक्रीवेळी शेतकऱ्यांना इतर दुय्यम खते, औषधे किंवा उत्पादने सक्तीने खरेदी करणे लागू नये याकरीता राज्यामध्ये अनुदानित खतांचे उत्पादक / पुरवठादार कंपन्या यांना अनुदानित खताची विक्री व पुरवठा करणेबाबत देण्यात आलेल्या परवान्यातील अनुदानित रासायनिक खते सोडून इतर विना-अनुदानित खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैवखते, जैवउत्तेजके इ. चा पुरवठा व विक्री करण्यास मनाई करण्याचा निर्णय घेतला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे वरसवाडी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील ग्रामस्थांना रस्त्याअभावी दळणवळणाच्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याबाबत

**(४) * ९५०९ श्रीमती भावना गवळी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुर्गम वाड्या-वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा म्हणून रस्ते बांधून देण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत असतानाही मौजे वरसवाडी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे अद्यापही पक्का रस्ता नसल्याने ग्रामस्थांना दळणवळणाच्या गंभीर अडचणींना सामोरे जावे लागत असून रस्त्याअभावी रुग्णवाहिका पोहोचू शकत नसल्याने एका आजारी महिलेला सुमारे ३ कि.मी. अंतरावरील इगतपुरी येथील रुग्णालयात चादरीच्या झोळीतून नेण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक ग्रामस्थांनी तसेच गावातील श्रमजीवी संघटनेने पक्का रस्ता तात्काळ बांधून देण्याकरीता मा.जिल्हाधिकारी, ठाणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (बांधकाम), ठाणे, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक-१, ठाणे (पश्चिम), उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शहापूर क्रमांक-१ यांचेकडे प्रत्यक्ष भेटून निवेदने सादर करुनही अद्यापही उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसून प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुसार मौजे वरसवाडी येथे तातडीने पक्का रस्ता बांधून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक ऊईके :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) वरसवाडी हा आदिवासी पाडा ता.शहापूर, जि.ठाणे मधील फुगाळे ग्रामपंचायतीमध्ये स्थित आहे. वरसवाडी हा आदिवासी पाडा शहापूर तालुक्यातील प्रजिमा ५४ वरील आघणवाडी या गावापासून २ कि.मी. अंतरावर आहे. आघणवाडी ते वरसवाडी पाडा रस्ता हा अवर्गीकृत रस्ता असून सदर रस्त्याची लांबीची जागा ही वन क्षेत्रात येते.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडून ठाणे जिल्ह्यातील आदिवासी वाडे पाडे जोडणारे अवर्गीकृत रस्त्याच्या संदर्भात प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या संदर्भात दिनांक १०/०६/२०२६ रोजीच्या शासन पत्रान्वये, विहीत कार्यपद्धती अवलंबून प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरातील गृहनिर्माण धोरणाची अंमलबजावणी करताना म्हाडासाठी २०% क्षेत्र राखून न ठेवल्याबाबत

**(५) * ९००९ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील चार हजार चौरस मीटरपेक्षा कमी भूखंडाची कृत्रिमरित्या विभागणी करुन गृहनिर्माण योजनेसाठी आवश्यक असलेली २० टक्के जमीन म्हाडाला न देता अनेक बांधकाम व्यावसायिकांनी महसूल व भूमी अभिलेख विभागाची पर्यायाने शासनाची फसवणूक केली असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणात अडगाव, म्हसरुळ, दासक, देवळाली, विहितगांव, नांदुर, गंगापूर आणि चेहरे या भागातील सुमारे १०८ प्रकरणात तलाठी आणि विभागीय अधिकाऱ्यांच्या कार्यालयातील नोंदीच्या प्राथमिक तपासणीत १५ बांधकाम व्यावसायिकांनी नियमांचे उल्लंघन केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नाशिक शहरातील गरिब नागरिकांसाठी राखीव असलेली जमीन व्यावसायिकांकडून म्हाडास परत देण्याबाबत तसेच म्हाडाच्या घरांवर अतिक्रमण करणाऱ्या दोषी विकासकांवर कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नगरविकास विभागाच्या दिनांक ८ नोव्हेंबर, २०१३ च्या अधिसूचनेन्वये निश्चित करण्यात आलेल्या गृहनिर्माण धोरणाच्या अंमलबजावणी दरम्यान नाशिक महानगरपालिका क्षेत्रामध्ये २०% क्षेत्र म्हाडासाठी राखून ठेवण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले होते. याबाबतची चौकशी करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली गठीत समितीने दिनांक ७ ऑक्टोबर, २०२५ रोजी सादर केलेल्या अहवालामध्ये ४९ पोटहिस्सा मोजणी प्रकरणांमध्ये नियमानुसार पोटहिस्सा मोजणी न करता भूमी अभिलेख कार्यालयाचे बनावट मोजणी नकाशे यांचा वापर करून शासनाची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले होते, हे खरे आहे. यासंदर्भात महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.३०७६ विधानसभेमध्ये दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी मांडण्यात आली होती.
(२) अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली गठीत चौकशी समितीने शासनास सादर केलेल्या अहवालामध्ये आडगाव, म्हसरूळ, दसक, देवळाली, विहितगांव, नांदुर, गंगापूर आणि चेहडी या भागातील एकूण १०८ प्रकरणांची तपासणी करण्यात आलेली आहे. त्यापैकी ५९ प्रकरणामध्ये भूमी अभिलेख विभागाकडून मोजणी करण्यात आलेली असून ४९ प्रकरणामध्ये नियमानुसार पोटहिस्सा मोजणी न करता भूमी अभिलेख कार्यालयाचे बनावट मोजणी नकाशे यांचा वापर करून शासनाची फसवणूक केल्याचे

निदर्शनास आले आहे. सदरचे ४९ प्रकरणात उप अधीक्षक भूमी अभिलेख, नाशिक यांचेकडून सरकारवाडा, पोलीस स्टेशन, नाशिक येथे दिनांक ०७/०३/२०२६ रोजी FIR No.००६४ गुन्हा दाखल करण्यात आलेला असून दिनांक १०/०३/२०२६ रोजी संबंधित क्षेत्रधारक आणि विकासक व त्यांचे सहकारी यांचा समावेश सदर गुन्ह्यातील आरोपीतांमध्ये करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखा युनिट क्र.१ नाशिक यांचेकडून करण्यात येत आहे.

(३) व (४) नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील २०% म्हाडा आरक्षणाच्या अंमलबजावणीत झालेल्या अनियमिततेची सविस्तर चौकशी करण्यासाठी शासन निर्णय दिनांक १३ एप्रिल, २०२६ अन्वये विभागीय आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर चौकशी समितीच्या दिनांक १५/०४/२०२६ ते १५/०६/२०२६ पर्यंत एकूण ११ बैठका घेण्यात आलेल्या आहेत. महसूल विभाग, भूमी अभिलेख विभाग, नगर रचना विभाग, नाशिक महानगरपालिका व म्हाडा, नाशिक यांचेकडून सरकारवाडा, पोलीस स्टेशन, नाशिक येथे ०७/०३/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या ४९ प्रकरणांची तपासणी करण्याकरीता नेमणूक करण्यात आलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांचेमार्फत तपासणीचे काम सुरू आहे.

सदर तपासणीमध्ये विविध विभागाचे एकूण ३० पेक्षा जास्त कार्यालये आणि १३ वर्षांपेक्षा जास्त कालावधीचे रेकॉर्ड तपासणी करण्याची आवश्यकता आहे. सदर तपासणीवेळी एकूण फाईलची संख्या विचारात घेता तसेच १३ वर्षांपेक्षा जास्त कालावधीचे विविध विभागांचे रेकॉर्ड एकत्रित करावे लागत आहे. त्यामुळे अध्यक्ष, चौकशी समिती तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांनी सदर चौकशी समितीस अतिरिक्त २ महिने मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला असून सदर चौकशी समितीस चौकशीकरीता अतिरिक्त २ महिने मुदतवाढ शासन निर्णय दिनांक १८/०६/२०२६ अन्वये देण्यात आलेली आहे.

-----------------

## राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६) * ९७४१ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दोन जनुक असलेल्या जुन्या तंत्रज्ञानाच्या बियाणांसाठी (BG-II) रुपये २,०००/- प्रतिकिलो या अवाजवी दराने खर्च करावा लागत असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेजारील देशांमध्ये अत्याधुनिक तीन जनुक तंत्रज्ञानावर आधारित कापसाचे प्रगत बियाणे भारतीय चलनानुसार अवघ्या रुपये ४००/- प्रतिकिलो दराने उपलब्ध असताना, भारतात मात्र जुन्या तंत्रज्ञानाच्या बियाणांसाठी शेतकऱ्यांना अधिक किंमत मोजावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या कृषी विभागाने प्रसिद्ध केलेल्या सन २०२५-२६ च्या दुसऱ्या आगाऊ अंदाजानुसार कापसाच्या उत्पादनात लक्षणीय घट झाली असून हेक्टरी उत्पादकता केवळ ३४८.४३० किलो इतकीच मर्यादित राहिली असून या वर्षीच्या कापूस हंगामाच्या सुरुवातीलाच बियाणांचा मोठ्या प्रमाणावर काळाबाजार होत असून, प्रतिबंधित ‘एचटीबीटी’ आणि बनावट बियाणांची चढ्या दराने विक्री होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील कापूस उत्पादकता वाढविण्यासाठी, बियाणांचा काळाबाजार रोखण्यासाठी आणि शेतकऱ्यांना कमी दरात 'सरळ वाणाचे' व दर्जेदार बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे नाही.
(२) पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अंतर्गत केंद्र सरकारच्या Genetic Engineering appraisal Committee द्वारे देशात जनुकीय बदल करुन तयार करण्यात येणाऱ्या बियाण्यांसाठी उत्पादन, विक्री व हाताळणी करीता मान्यता देण्यात येते. देशात Cry 1Ac and Cry 2Ab ही जनुके असलेले बी.टी. कापूस वाण विक्री करण्यास परवानगी दिलेली आहे. अत्यावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ व कापूस बियाणे मूल्य (नियंत्रण) आदेश, २०१५ अन्वये केंद्र शासन बी.टी. कापूस बियाण्याची किंमत निर्धारित करत असते. सन २०२५-२६ करीता केंद्र शासनाने ही किंमत रुपये ९०१/- (४७५ ग्रॅम प्रति पाकीट) निर्धारित केलेली आहे. सन २०२६-२७ साठी हे दर कायम ठेवले आहेत.
(३) राज्यात सन २०२५-२६ च्या द्वितीय पुर्वानुमान अहवालानुसार सरासरीच्या तुलनेत क्षेत्र व उत्पादनात अनुक्रमे ९ व ३ टक्के घट झाली असून, उत्पादकतेत ६ टक्के वाढ (सन २०१९ ते सन २०२४ च्या सरासरी ३२७ किलो प्रति हे. च्या तुलनेत सन २०२५-२६ मध्ये ३४८ किलो प्रति हे.) झाली आहे. प्रतिबंधित एच.टी.बी.टी. व बनावट बियाण्यांची चढ्यादराने विक्री होत असलेबाबत तक्रारी प्राप्त झाल्या नाहीत.
(४) कापूस उत्पादकता अभियान (कपास कांती) योजनेंतर्गत सन २०२६-२७ मध्ये १९१.०० कोटीची तरतूद केली असून १,०७,१२५ हेक्टरवर पीक प्रात्यक्षिके कार्यक्रम राबविण्यात येत आहे. कापसामध्ये सरळ वाणांची विक्री होण्याकरीता शासनस्तरावरुन सरळ वाणाचे विक्रीचे दर निर्धारित केले असून सन २०२५-२६ पासून राज्यात संकरीत देशी कापूस (नॉन बी टी) चे दर रुपये ८५२/- (४५० ग्रॅम प्रति पाकीट) निर्धारित करण्यात आले आहेत. बियाणांचा काळाबाजार रोखण्यासाठी राज्यात बियाण्याचे गुण नियंत्रण करण्यासाठी एकूण ८७४ गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच राज्य, विभाग व जिल्हास्तरावर ४४ भरारी पथके कार्यान्वित आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात वाळू माफियांकडून महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांवर हल्ले होत असल्याबाबत

**(७) * ९८०२ श्री.विक्रम काळे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यात अवैध मुरुम उत्खननावर छापा घालण्यासाठी गेलेल्या नायब तहसीलदारांना वाळू व मुरुम माफियांनी जेसीबीला लटकवून ४ किलोमीटर पर्यंत ओढत नेल्याचा अत्यंत जीवघेणा प्रकार दिनांक ७ मे, २०२६ रोजी घडला असल्याचे तसेच कानळदा (जि.जळगाव) येथे दिनांक १४ मे, २०२६ रोजी वा त्यासुमारास अवैध वाळू उपशावर कारवाई करण्यासाठी गेलेल्या महसूल पथकाला धक्काबुक्की व दमदाटी करण्यात आल्याचेही निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, बोरगाव कासारे येथे दिनांक ३० मार्च, २०२६ रोजी अवैध वाळू उपसा सुरू असताना वाळू माफियांनी दोन तलाठ्यांना मारहाण केल्याचे, सन २०२५ मध्ये उपळी येथे वाळू माफियांनी तहसीलदारांची जीप जाळण्याचा प्रयत्न केल्याने शासकीय कर्तव्य बजाविणाऱ्या अधिकाऱ्यांवर वाळू माफियांकडून होणाऱ्या जीवघेण्या हल्ल्यांमुळे महसूल प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गोदावरी, पूर्णा, मांजरा, तेरणा या मोठ्या नद्यांसह लहान नद्या-नाल्यांमधील वाळू उपसा अवैधरीत्या स्थानिक अधिकाऱ्यांच्या मदतीने मोठ्या प्रमाणावर करण्यात येत असून, जेसीबी, पोकलेनने रात्री-अपरात्री मोठ्या प्रमाणात अवैधरित्या वाळू उत्खनन करून नदीपात्रातील ५० फुटांपर्यंतची वाळू काढली जात असल्याचे स्थानिक अधिकाऱ्यांच्या निदर्शनास येऊनही त्यांनी संबंधित वाळू माफियांवर कोणतीही कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आणि त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच अशा प्रकारच्या माफियांच्या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी आणि मुरुम/वाळू चोरीच्या ठिकाणी महसूल अधिकाऱ्यांना पोलीस संरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती प्रतिबंधात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मौजे बोरी नाईक, ता.कुही, जि.नागपूर परिसरात मुरूम माफियांनी अवैध उत्खननाविरुद्ध कारवाईसाठी गेलेल्या पथकावर हल्ला चढविल्याने संबंधितांविरुद्ध पोलीस स्टेशन बेलतूर, नागपूर ग्रामीण येथे गु.र.क्र. ०१०२/२०२६ भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस.), २०२३- कलम ३०३(२), ६२, १३२, २२१, १२१(१), महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६० चे कलम ४८(७) व ४८(८), खाण आणि खनिज (नियमन व विकास) अधिनियम, १९५७ चे कलम ४ व २१ आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४८(७) व ४८(८) अन्वये दंडात्मक कारवाई करण्याची कार्यवाही सुरू आहे.

मौजे कानळदा, ता.जळगाव येथे दिनांक १२/०५/२०२६ रोजी गिरणा नदीपात्रात ग्राम महसूल अधिकारी, कानळदा व पोलीस पाटील कानळदा, यांना अवैध वाळू वाहतुकीस प्रतिबंध करत असताना डंपर व डोझर वाहन धारकाकडून धक्का-बुक्की व दमदाटी करुन कामात अडथळा निर्माण केला. त्यानुषंगाने जळगाव पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता, २०२३ अन्वये दिनांक १२/०५/२०२६ रोजी गु.र.क्र.०१४३/२०२६ रोजी कलम १३२, कलम ३०३(२), कलम २२१, कलम ११५(२), कलम ३५१(२), कलम ३(५). खाण आणि खनिज (नियमन आणि विकास) अधिनियम, १९५७ च्या कलम २१ अन्वये व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४८(७) व कलम ४८(८) अन्वये गुन्हा नोंदविला आहे.
(२) मौजे बोरगाव कासारे येथे दिनांक ३०/०३/२०२६ रोजी अवैध वाळू उपसा सुरु असताना वाळू माफियांना दोन तलाठ्यांना मारहाण केली अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

तथापि, उपळी, ता.सिल्लोड येथे तालुकास्तरीय अवैध वाळू उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी पथक गस्तीवर दिनांक १२/०२/२०२५ रोजी अवैध गौण खनिज वाहतूक रोखणे कामी गेले असता, वाळू माफियांच्या विरोधात पोलीस स्टेशन सिल्लोड ग्रामीण येथे ४१/२०२५ भारतीय न्याय संहिता,२०२३ अन्वये १३२, ३०३ (२),१९१(१), १९१(२), १९१(३), १९०, ३२४(४), २१(१), २१(२), अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) छत्रपती संभाजीनगर व जळगाव जिल्ह्यात वाळूची अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर भरारी पथकाची नेमणूक करण्यात आली असून सदर भरारी पथकामार्फत गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर वेळोवेळी कारवाई करण्यात आली आहे.

सन २०२५-२०२६ मध्ये नागपूर जिल्ह्यात अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्या एकूण २६१ अवैध वाहतूक प्रकरणी कारवाई करण्यात आली असून एकूण रक्कम रुपये ४,३२,०५,०६५/- इतका दंड आकारण्यात आला आहे. त्यापैकी रक्कम रुपये ३,८९,२४,१३२/- इतका दंड वसूल करुन शासन जमा करण्यात आला आहे. एकूण ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच अवैध वाहतूक करणारे १४ वाहने जप्त करण्यात आली.

जळगाव जिल्ह्यात अवैध उत्खननाबाबत जिल्हा प्रशासनाकडून नियमित तपासणी केली जात असून अवैध उत्खननाबाबत व वाहतुकीबाबत जिल्हा, उपविभाग, व तालुकास्तरावर नियमितपणे प्रकरणांचा शोध घेऊन कारवाई केली जाते. जळगाव जिल्ह्यात गेल्या दोन वर्षात अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणांमध्ये १४४५ एवढ्या प्रकरणांमध्ये २०,३९,७४,०००/- दंडाची आकारणी करण्यात आली असून सदर आकारण्यात आलेल्या दंडाच्या रकमेपैकी १३,९६,०९,०००/- रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. तसेच ९८ एवढे फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर मध्ये सन २०२५-२०२६ मध्ये जिल्ह्यात अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्या एकूण २१७ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून एकूण रक्कम रुपये ३,९०,७०,०००/- इतका दंड आकारण्यात आला आहे. त्यापैकी रक्कम रुपये २,०९,०९,०००/- इतका दंड वसूल करुन शासन जमा करण्यात आला आहे. एकूण ४० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे महासंचालक पद पूर्णवेळ नियुक्त करण्याबाबत

**(८) * ९८६८ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व कौशल्य विकासासाठी कार्यरत असलेली पुणे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे (बार्टी) चे कामकाज गेल्या महिन्याभरापासून पूर्णवेळ महासंचालकांशिवाय सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्णवेळ महासंचालक पद रिक्त असल्यामुळे तसेच संस्थेच्या नियामक मंडळाच्या नियमित बैठका न झाल्यामुळे विद्यावेतन परदेशी शिष्यवृत्ती आणि विद्यार्थ्यांचे इतर कौशल्य विकास योजनांचे शेकडो प्रस्ताव मंजुरीविना प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने 'बार्टी' संस्थेच्या महासंचालक पदावर पूर्णवेळ आय.ए.एस. दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत व प्रलंबित प्रस्ताव जलद गतीने मंजूर करण्याबाबत शासन स्तरावर कोणती विशेष मोहीम राबविण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) हे खरे आहे.

या विभागाच्या दिनांक ११ मार्च, २०२६ च्या शासन आदेशान्वये महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या पदाचा अतिरिक्त कार्यभार आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.

आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील अतिरिक्त कार्यभाराच्या कालावधीत विविध प्रशिक्षण, विद्यावेतन, कौशल्य विकास योजना व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या संस्थेचे कामकाज सुरळीतपणे सुरु आहे. तसेच महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांचेस्तरावरुन नियामक मंडळाची बैठक आयोजित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) सेवाप्रवेश नियमातील तरतुदी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या संस्थेचे महत्त्व विचारात घेता महासंचालक हे पद भरण्याची कार्यवाही करण्यात येत असून, कोणत्याही विद्यार्थी योजनांचे प्रस्ताव प्रलंबित नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात रासायनिक खतांचा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांकडून केली जाणारी लिंकिंग पद्धत बंद करण्याबाबत

**(९) * १००६३ श्री.हेमंत पाटील, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील रासायनिक खतांच्या पुरवठ्यात कंपन्यांकडून केली जाणारी 'लिंकिंग' पद्धत युरियासोबत इतर खते/कीटकनाशके घेण्याची सक्ती बंद करावी यासह इतर प्रलंबित मागण्यांसाठी दिनांक २७ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान मराठवाड्यातील सुमारे १८,५१५ कृषी निविष्ठा केंद्रे बंद ठेवून बेमुदत आंदोलन पुकारण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कृषी केंद्र चालकांनी खताच्या पुरवठ्यात कंपन्यांकडून लिंकिंग पद्धतीमुळे शेतकऱ्यांवर सक्ती होत असल्यामुळे सुमारे ९० टक्के प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांना नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खत विक्रीतील हा 'लिंकिंग' प्रकार थांबवून शेतकऱ्यांची आर्थिक लूट थांबवण्यासाठी तसेच दोषी कंपन्या व विक्रेत्यांवर कारवाई करण्यासंदर्भात तसेच कृषी केंद्र चालकांच्या मागण्या मान्य करण्याच्या अनुषंगाने आणि खतांच्या काळ्या बाजाराला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) व (२) कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या मागण्यासंदर्भात त्यांचे बेमुदत आंदोलन दिनांक २७ एप्रिल, २०२६ ते दिनांक २९ एप्रिल, २०२६ या कालावधीत झाले होते.

कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या मागण्यासंदर्भात मा.मंत्री (कृषी) महोदयांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र फर्टीलायझरर्स, पेस्टीसाईडस् व सीडस् डिलर्स असो. यांचे निवेदनाच्या अनुषंगाने बैठक झाली. सदर बैठकीत खत उत्पादक कंपन्यांकडून रासायनिक खतांचा पुरवठा होताना होत असलेले लिंकिंग बंद करावे याबाबत चर्चा झाली. त्याअनुषंगाने लिंकिंग बंद करण्याबाबत सदर बैठकीत सकारात्मक चर्चा झाल्यामुळे सदर बेमुदत आंदोलन दिनांक २९ एप्रिल, २०२६ रोजी मागे घेण्यात आले.

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर खत व बियाणे पुरवठा नियमितपणे सुरु होता.
(३) राज्यात लिंकिंग पद्धत थांबविण्यासाठी शेतकऱ्यांचा हिताचा विचार करुन उत्तरप्रदेश व मध्यप्रदेश राज्याने काढलेल्या आदेशाच्या धर्तीवर राज्यामध्ये अनुदानित खतांचे उत्पादक / पुरवठादार कंपन्या यांना अनुदानित खताची विक्री व पुरवठा करणेबाबत देण्यात आलेल्या परवान्यातील अनुदानित रासायनिक खते सोडून इतर विना-अनुदानित खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैवखते, जैवउत्तेजके इ. चा पुरवठा व विक्री करण्यास मनाई करण्याचा निर्णय दिनांक २०/०५/२०२६ रोजी घेतला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक रिंग रोडच्या जमीन मोजणी प्रक्रियेस विरोध करणाऱ्या शेतकरी महिलांना तत्कालीन प्रांताधिकारी यांनी मारहाण केल्याबाबत

**(१०) * १०५२२ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक रिंग रोडच्या (जि.नाशिक) भूसंपादनासाठी जमीन मोजणीच्या प्रक्रियेदरम्यान स्थानिक शेतकरी आणि महसूल अधिकारी यांच्यात तीव्र वाद झाला असून शेतकऱ्यांकडून जमीन मोजणीला विरोध केला जात असताना तत्कालीन प्रांताधिकारी आणि पोलीस प्रशासनाकडून बळाचा वापर करण्यात येऊन मुंगसरे (जि.नाशिक) येथे प्रांताधिकारी यांनी एका घरात घुसून ८० वर्षांच्या वृद्ध महिलेसह इतर शेतकरी महिलांना अमानुषपणे मारहाण केल्याची घटना माहे मे, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासकीय दंडशाही आणि दडपशाहीविरोधात बाधित शेतकऱ्यांनी नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढला असून रिंग रोडच्या विद्यमान आराखड्यामुळे शेतकऱ्यांची सुपीक शेती, घरे आणि विहिरी नष्ट होत असल्याने याचा मार्ग बदलण्यात यावा अशी मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३) व (४) नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळयाच्या आयोजनास्तव बाह्य रिंगरोडसाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे. त्यानुषंगाने मातोरी व मुंगसरे या गावातील भूसंपादनास बाधित शेतकऱ्यांचा विरोध आहे. सदर संपादनाच्या कार्यवाहीमध्ये दिनांक ०२/०५/२०२६ रोजी सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, नाशिक मोजणीसाठी गेले असता काही शेतकरी आत्मदहनाच्या प्रयत्नात असल्याचे निदर्शनास आल्याने अनर्थ टाळण्यासाठी महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या मदतीने कार्यवाही करण्यात आली. तथापि, मारहाण झाल्याची वस्तुस्थिती निदर्शनास आलेली नाही. तसेच संबंधित सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, नाशिक यांनी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे दिनांक ०७/०५/२०२६ रोजी खुलासा सादर केलेला असून खुलाशात त्यांनी सदर महिलेला मारहाण केल्याचे नाकारले आहे.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील कृषी विभागाच्या जिल्हा धोरणात्मक योजनेंतर्गत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(११) * १०६१७ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून कृषी विभागामार्फत शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी राबविण्यात आलेल्या सुमारे २८ कोटी रुपयांच्या 'जिल्हा धोरणात्मक योजनेत' शासनाची विहित कार्यपद्धती, अटी-शर्ती व पात्रतेचे निकष डावलून नियमबाह्य कामकाज झाल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी आयुक्तालयाची आवश्यक तांत्रिक मंजुरी न घेता केवळ जिल्हास्तरावरच समिती स्थापन करून कोट्यवधी रुपयांच्या प्रकल्पांना परस्पर मान्यता देण्यात आली, तसेच कामांचे मूल्यमापन, स्थळ पाहणी व सविस्तर प्रकल्प अहवालांची कोणतीही वैधता न तपासताच सुमारे १९ कोटी रुपयांहून अधिकची अग्रिम रक्कम या कंपन्यांना वितरित करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत लाभार्थी म्हणून निवडण्यात आलेल्या अनेक शेतकरी उत्पादक कंपन्यांमध्ये प्रत्यक्षात शेतकरी सभासदच नसणे, एकाच कुटुंबातील सदस्य विविध कंपन्यांमध्ये संचालक असणे, कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांच्या कंपन्यांना लाभ देणे आणि बोगस व अपात्र घटकांना प्राधान्य देणे अशा बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संपूर्ण गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१), (२), (३) व (४) जिल्हा विकास आराखडा अंतर्गत कृषी विभागामार्फत सन २०२५-२६ मध्ये नंदुरबार जिल्ह्यात एकूण २१ शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रकल्प मंजूर करताना झालेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने दक्षता पथक, कृषी आयुक्तालय यांचा ०४/०९/२०२५ चा अहवाल, जिल्हाधिकारी, नंदुरबार यांचे दिनांक ०६/०४/२०२६ चे पत्र व कृषी आयुक्तालयाची शिफारस विचारात घेता, शासन आदेश क्रमांक कृअनि-१३२६/ प्र.क्र.७७/ ई-१६२७१३४/ ५-अे, दिनांक २६/०५/२०२६ अन्वये तत्कालीन प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नंदुरबार, श्री.चेतन कुमार ठाकरे यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ नुसार पुढील शिस्तंभंगविषयक कार्यवाही कार्यान्वित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## झिंगानूर (ता.सिरोंचा, जि.गडचिरोली) येथील शासकीय खरेदी केंद्रावर धान उघड्यावर ठेवल्यामुळे नुकसान झाल्याबाबत

**(१२) * ९१६१ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झिंगानूर (ता.सिरोंचा, जि.गडचिरोली) येथील शासकीय खरेदी केंद्रावर गेल्या दोन वर्षांपासून खरेदी केलेला हजारो क्विंटल धान (भात) उघड्यावर पडून सडत असल्यामुळे आदिवासी विकास महामंडळाच्या (शबरी) कार्यप्रणालीतील त्रुटी व गैरकारभार उघडकीस आल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय नियमांनुसार खरेदी केलेला धान तातडीने उचलून भरडाईसाठी मिलर्सकडे पाठविणे व त्यानंतर रेशन दुकानांमार्फत वितरित करणे बंधनकारक असताना, सदर धान गोदामात न ठेवता उघड्यावर सडू दिल्याने शासकीय नियमांचे उल्लंघन व सार्वजनिक निधीचा अपव्यय झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच धान खरेदी केंद्रावरील खरेदीपासून ते मिलिंग व वितरणाच्या संपूर्ण साखळीत पारदर्शकता आणण्यासाठी आणि भविष्यात अशा प्रकारांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी शासनस्तरावर काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक ऊईके :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या उप प्रादेशिक कार्यालयांतर्गत खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये आदिवासी विविध कार्यकारी सह. संस्थेचे खरेदी केंद्र झिंगानूर येथे १५३३५.२० क्विंटल धान खरेदी करण्यात आलेली असून केंद्राकडे २००० क्विंटल क्षमतेचे गोदाम उपलब्ध असल्याने शेतकऱ्यांच्या हितार्थ उर्वरित १३३३५.२० क्विंटल धान खरेदी उघड्यावर करण्यात आलेली होती. गडचिरोली जिल्ह्यात राईस मिलर्सची संख्या व त्यांची भरडाईची क्षमता कमी असल्याने हंगाम २०२४-२५ मधील झिंगानूर येथील धान भरडाईविना

शिल्लक राहिल्याने ताडपत्रीने झाकून ठेवण्यात आला होता. परंतु उन, वारा, पाऊस व नैसर्गिक आर्द्रतेमुळे काही प्रमाणात धानाची पत खालावली होती. सदर शिल्लक धान दिनांक २९/०९/२०१९ च्या शासन निर्णयानुसार लिलावात ठेवून याची विक्री झालेली असून जावक सुरू आहे.

(२) हे खरे नाही.

गडचिरोली जिल्ह्यातील राईस मिलर्सची संख्या व त्यांची भरडाईची क्षमता कमी असल्याने खरेदी केलेला धान भरडाईविना शिल्लक राहिला होता. परंतु उघड्यावर खरेदी केलेला धान झाकण्यासाठी खरेदी केंद्रास ताडपत्र्या उपलब्ध करून दिलेल्या होत्या.

तसेच, शासनाने ठरवून दिलेल्या कार्यप्रणालीनुसारच महामंडळाद्वारे खरेदी व भरडाई प्रक्रिया राबविलेली असून शासकीय नियमांचे उल्लंघन किंवा सार्वजनिक निधीचा अपव्यय केलेला नाही.

(३) शासन निर्णय व परिपत्रकानुसारच खरेदी व भरडाई प्रक्रिया राबविलेली असून कुठलाही गैरप्रकार झालेला नसल्याने चौकशीचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तसेच, गडचिरोली जिल्ह्यातील धानाची भरडाई करण्याची परवानगी शासनाने दिलेली असून त्यानुसार भरडाई प्रक्रिया राबविण्याची उपाययोजना करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरणगाव व भुसावळ (जि.जळगाव) परिसरात अवैधरित्या वृक्षतोड केल्याबाबत

**(१३) * १०२१४ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरणगाव व भुसावळ (जि.जळगाव) परिसरात मोठ्या प्रमाणावर मौल्यवान व जुन्या वृक्षांची अवैध तोड करून, या लाकडाची विनापरवाना राज्याबाहेर वाहतूक व विक्री होत असल्याची बाब दिनांक ७ मे, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाच्या नियमांचे उल्लंघन करून आधुनिक यंत्रांच्या सहाय्याने सुरू असलेल्या या बेकायदेशीर वृक्षतोडीमुळे स्थानिक पर्यावरणाचे, जैवविविधतेचे आणि वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अवैध वृक्षतोड रोखण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे तसेच विनापरवाना वृक्षतोड करणाऱ्यांवर व त्यांना पाठीशी घालणाऱ्या कर्मचाऱ्यांवर आतापर्यंत कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) जळगाव वनविभागातील वरणगाव व भुसावळ (जि.जळगाव) परिसरातील वनक्षेत्रात कोणतेही अवैध वृक्षतोड झालेली नाही. परंतु, लाकडाची विनापरवाना राज्याबाहेर वाहतूक किंवा विक्री झाल्याने माहे, २०२६ मध्ये वनक्षेत्राबाहेरील वृक्षतोड अधिनियम अंतर्गत २ तक्रारीच्या अनुषंगाने दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(२) जळगाव वनविभागातील वरणगाव व भुसावळ (जि.जळगाव) परिसरात कोणतेही बेकायदेशीर वृक्षतोड झालेली नसल्याने स्थानिक पर्यावरण, जैवविविधता आणि वन्यजीवांच्या अधिवासाचे नुकसान झालेले नाही.

(३) जळगाव वनविभागातील वरणगाव व भुसावळ (जि.जळगाव) परिसरातील नमूद केलेल्या दिनांकास वा त्यासुमारास कोणतेही अवैध वृक्षतोड झालेली नसल्याने कोणावरही दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बरबडा, घुंगराळा व नरसी (ता.नायगाव, जि.नांदेड) मंडळातील शेतकरी पीक विम्याच्या लाभापासून वंचित असल्याबाबत

**(१४) * १०१९० श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील घुंगराळा व नरसी (ता.नायगाव) या महसूल मंडळांतील शेतकरी पीक विम्याच्या लाभापासून वंचित असून प्रशासकीय यंत्रणेबाबत शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालुक्यातील इतर अनेक महसूल मंडळांतील शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पीक विम्याची रक्कम जमा झाली असताना, केवळ बरबडा, घुंगराळा व नरसी या मंडळांतील शेतकरी अद्याप लाभापासून वंचित असून संबंधित मंडळांतील आणेवारी प्रक्रिया, पोर्टल क्लिअरन्स अथवा विमा कंपनीच्या मंजुरीतील विलंब यामुळे पीक विमा प्रक्रिया प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पीक विमा संदर्भात संबंधित अधिकारी व विमा कंपनीकडून वेगवेगळी माहिती दिली जात असून प्रत्यक्षात पीक विमा रक्कम कधी जमा होणार याबाबत निश्चित माहिती न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सदर वंचित महसूल मंडळांतील शेतकऱ्यांच्या खात्यात पीक विम्याची रक्कम तातडीने जमा करण्याबाबत आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) नांदेड जिल्ह्यातील नायगाव तालुक्यात माहे मे, २०२६ च्या सुमारास शेतकऱ्यांकडून पीक विमा नुकसान भरपाई संदर्भातील निवेदने प्राप्त झाली होती.
(२) व (३) नाही.

बरबडा, घुंगराळ व नरसी या महसूल मंडळात आतापर्यंत रुपये ३६२.६३ लाख इतकी नुकसान भरपाई मंजूर झाली आहे.

त्यापैकी रुपये ३६२.५५ लाख इतकी नुकसान भरपाई पात्र शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा करण्यात आली आहे. उर्वरित नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर येथे कृषी निविष्ठा पुरवठा कामात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१५) * १०४३८ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, चंद्रपूर यांनी सन २०२४-२५ मध्ये 'जिल्हा खनिज प्रतिष्ठान' च्या निधीमधून भात व हरभरा उत्पादकता वाढीसाठी जैविक औषधे आणि सूक्ष्म मूलद्रव्ये पुरवठा करण्याच्या कामात सुमारे १.९२ कोटी रुपये व कृषी अवजारे बँकेसाठी ३.०४ कोटी रुपये, तसेच 'जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत कृषी अवजारे बँकेसाठी ४.०४४ कोटी रुपये आणि कृषी विभागाच्या इतर नियमित योजनांच्या कामांमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर येथे रुजू होण्यापूर्वी सदर अधिकारी वाशिम जिल्ह्यात कार्यरत असताना, त्यांनी तेथील कृषी विभागाच्या विविध योजनांमध्येही मोठ्या प्रमाणावर अनियमितता करून गैरव्यवहार केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व गैरव्यवहारांची तातडीने चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींनी मा.कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी केली आहे काय, सदर चौकशीत काय आढळून आले तसेच चौकशीच्या अनुषंगाने शासनाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०२४-२५ मध्ये प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY) अंतर्गत जिल्हा खनिज प्रतिष्ठानमार्फत भात व हरभरा पिकांच्या उत्पादकता वाढीसाठी राबविण्यात आलेल्या एकात्मिक अन्नद्रव्य व जैविक किड-रोग व्यवस्थापन घटकाच्या अंमलबजावणीत रुपये १.९२ कोटीची अनियमितता झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

(२) याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. तथापि, यासंदर्भात नेमलेल्या सुधांशू समितीने तक्रारीत तथ्य नसल्याने त्या निकाली काढल्या आहेत.

(३) अशा आशयाचे पत्र शासनास प्राप्त झालेले नाही.

(४) याबाबत, विभागीय कृषी सह संचालक, नागपूर यांचेमार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणासाठी सादर करण्यात आलेल्या संशोधन अहवालातील लोकसंख्येच्या आकडेवारीत तफावत आढळून आल्याबाबत

**(१६) * ९७७५ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जातींच्या १३ टक्के आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्यासंदर्भात स्थापन करण्यात आलेल्या न्या.बदर समितीला सादर करण्यात आलेल्या संशोधन अहवालातील लोकसंख्येच्या आकडेवारीवर मातंग समाजाकडून तीव्र संशय व आक्षेप व्यक्त केला जात असल्याचे माहे मे, २०२६ च्या प्रथम सप्ताहात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेने (बार्टी) तयार केलेल्या तुलनात्मक अभ्यास व संशोधन अहवालात, १९९१ व २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार महार व मातंग समाजाच्या लोकसंख्या वाढीच्या दरामध्ये अनैसर्गिक व अत्यंत मोठी तफावत आढळून आली असून सदर अहवालात, १९९१ च्या जनगणनेच्या तुलनेत महार समाजाची लोकसंख्या थेट १३ लाखांवरून ५१ लाख (५८ टक्के वाढ) झाल्याचे दर्शविण्यात आले असून, याच कालावधीत मातंग समाजाच्या लोकसंख्या वाढीचा दर मात्र ३० टक्क्यांवरून १९ टक्क्यांपर्यंत खाली आल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सांख्यिकीय विसंगतीमुळे अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण झाल्यास मातंग समाजाच्या वाट्याला येणाऱ्या आरक्षणाच्या कोट्याला मोठा फटका बसण्याची भीती संबंधित समाजाकडून व्यक्त होत असून, उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेसाठी १९६१ ची जनगणना आधारभूत मानण्यात यावी, अशी मागणी विविध संघटनांकडून शासनाकडे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, 'बार्टी' च्या अहवालातील या सांख्यिकीय विसंगतींची फेरपडताळणी करण्यासाठी, लोकसंख्येच्या आकडेवारीतील त्रुटी दूर करण्यासाठी आणि मातंग समाजावर होणारा संभाव्य अन्याय रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) हे खरे आहे.

यासंदर्भात दिनांक २० मे, २०२६ रोजी शासनाकडे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) हे खरे नाही.

भारताचे रजिस्ट्रार जनरल व जनगणना आयुक्त कार्यालय यांच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेने (बार्टी) माहे जुलै, २०२३ मध्ये शासनास सादर केलेल्या अहवालामध्ये लोकसंख्याविषयक आकडेवारीचा समावेश केलेला आहे.

त्यानुसार, सन १९९१ मध्ये महार समाजाची लोकसंख्या ५१.२० लाख (५८.८२ %) इतकी असून सन २०११ मध्ये ८०.०६ लाख (६२.२२ %) इतकी झाली असून सदर वाढ ३.४० % इतकी आहे. तसेच, सन १९९१ मध्ये मातंग समाजाची लोकसंख्या १६.५४ लाख (१९.०० %) इतकी असून सन २०११ मध्ये २४.८८ लाख (१९.३४%) इतकी झाली असून सदर वाढ ०.३४ % इतकी आहे.

(३) राज्यातील अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करताना १९६१ च्या जनगणनेचा आधार घ्यावा अशी मागणी २० मे, २०२६ रोजीच्या निवेदनात करण्यात आली आहे.
(४) बार्टीने शासनास सादर केलेल्या अहवालात नमूद लोकसंख्याविषयक आकडेवारी ही बार्टी, पुणे या संस्थेने तयार केलेली नसून भारताचे रजिस्ट्रार जनरल व जनगणना आयुक्त कार्यालय यांनी अंतिम केलेली असल्याने राज्य शासनस्तरावर फेरपडताळणी/ दुरुस्त करता येणार नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अवैध वाळू उपसामुळे तयार झालेल्या खदाणीतील दुर्घटनांबाबत

**(१७) * ९८१० श्री.विक्रम काळे, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात छत्रपती संभाजीनगर, जालना व जळगाव जिल्ह्यांमध्ये गौण खनिज आणि वाळू माफियांनी मोठ्या प्रमाणात बोटी, तराफे, क्रशर, पोकलेन, जेसीबीने अवैधरित्या गौण खनिजे व वाळूचा उपसा केल्यामुळे निर्माण झालेल्या खदाणीमध्ये मागील ४ वर्षांत अनेकांचा मृत्यू झाला असून सन २०२० मध्ये मौजे राक्षसभूवन (ता.गेवराई, जि.बीड) येथे ४ विद्यार्थ्यांचा व सन २०२५ मध्ये जालना जिल्ह्यात ३ तरुणांचा व सन २०२६ मध्ये कपडे धुण्यासाठी गेलेल्या दोन महिलांचा खदाणीत बुडून मृत्यू झाला असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, (ता.जि.जळगाव) येथे गिरणा नदीपात्रातून एकाच वेळी तब्बल १५ ते २० ट्रॅक्टरद्वारे अवैध वाळू उपसा सुरू असल्याचे तसेच वडनगरी येथे गिरणा नदी पात्रात झालेल्या अवैध वाळू उत्खननामुळे एका शेतकऱ्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू मफियावंर शासनाने कोणती कारवाई केली तसेच अवैध वाळू उपसा करणाऱ्या माफियांवर कोणती कारवाई केली तसेच अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांनी खोदलेल्या खदानी बुजविण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मौजे. राक्षसभूवन, ता.गेवराई येथे सन २०२० मध्ये ०४ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची घटना निदर्शनास आलेली नाही. जालना जिल्ह्यात अवैधरित्या गौण खनिजे व वाळूचा उपसा केल्यामुळे झालेल्या खदाणीमध्ये ३ तरूण किंवा २०२६ मध्ये २ महिलांचा मृत्यू झाल्याची घटना झालेली नाही. तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गौण खनिजे व वाळूचा उपसा केल्यामुळे निर्माण झालेल्या खदाणीमध्ये बुडून मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) व (३) मौजे वडनगरी ता.जळगाव येथे दिनांक १२/०५/२०२६ रोजी कै. दिलीप रामभाऊ कल्याणकर या शेतमजूराचा पाण्याचा अंदाज न आल्याने पाण्यात बुडून मृत्यू झाला. सदर मृत्यू अवैध वाळू उत्खननामुळे झाला अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

जळगाव जिल्ह्यात अवैध उत्खननाबाबत जिल्हा प्रशासनाकडून नियमित तपासणी केली जात असून अवैध उत्खननाबाबत व वाहतुकीबाबत जिल्हा, उपविभाग, व तालुकास्तरावर नियमितपणे प्रकरणांचा शोध घेऊन कारवाई केली जाते. जळगाव जिल्ह्यात गेल्या दोन वर्षात अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणांमध्ये १४४५ एवढ्या प्रकरणांमध्ये २०,३९,७४,०००/- दंडाची आकारणी करण्यात आली असून सदर आकारण्यात आलेल्या दंडाच्या रकमेपैकी १३,९६,०९,०००/- रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. तसेच ९८ एवढे फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर मध्ये सन २०२५-२०२६ मध्ये अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्या एकूण २१७ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून एकूण रक्कम रुपये ३,९०,७०,०००/- इतका दंड आकारण्यात आला आहे. त्यापैकी रक्कम रुपये २,०९,०९,०००/- इतका दंड वसूल करून शासन जमा करण्यात आला आहे. एकूण ४० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जालना जिल्ह्यात माहे एप्रिल २०२५ पासून अवैध गौण खनिज व वाहतूक प्रकरणात ३२१ प्रतिबंधात्मक कार्यवाही करून रुपये ६६०.१७ लक्ष दंड आकारणात आला आहे त्यापैकी रुपये २३१.३३ लक्ष वसूली करण्यात आली उर्वरित वसूलीची कार्यवाही सुरु आहे. तसेच महसूल विभागाने १२९ जणांवर, पोलीस विभागाने १३७ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वाळूची अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर भरारी पथकाची नेमणूक करण्यात आली असून सदर भरारी पथकामार्फत गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर वेळोवेळी कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे हिरडपुडी (ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील गोदावरी नदीपात्रातील अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१८) * १०५३७ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हिरडपुडी (ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील गोदावरी नदीपात्रातून यांत्रिक बोटी व सक्शन पंपाच्या सहाय्याने दररोज सुमारे १००० ब्रास इतक्या प्रचंड प्रमाणात अवैध वाळूचा उपसा सुरू असून यामुळे नदीचे नैसर्गिक अस्तित्व व पर्यावरण धोक्यात आल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवैध वाळू उपशामुळे नदीपात्र अत्यंत खोल गेले असून परिसरातील भूजल आणि विहिरींची पाणी पातळी खालावल्याने याबाबत स्थानिक नागरिकांनी व शेतकऱ्यांनी वारंवार पाचोड पोलीस ठाण्याच्या निदर्शनास आणून देखील कोणतीही कार्यवाही होत नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर, जप्त केलेली वाहने/बोटी यांच्यावर आणि वाळू माफियांशी संगनमत असणाऱ्या दोषी पोलीस व महसूल कर्मचाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अवैध वाळू उपसा करणारे माफिया यांच्यासोबत पोलीस व महसूल कर्मचारी यांचे संगनमत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

पैठण तालुक्यात वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या भरारी पथकाने माहे एप्रिल, २०२६ ते आजरोजीपर्यंत १९ वाहनांवर कारवाई करुन रुपये १७,८०,४६०/- एवढी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ताडोबा-अंधारी व्याघ्र सफारीचा कालावधी व वाहनांची संख्या मर्यादित करण्याबाबत

**(१९)** * **१०३०४ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पासह देशातील प्रमुख अभयारण्यांमध्ये पर्यटकांच्या वाढत्या गर्दीमुळे व वाहनांच्या संख्येमुळे वाघांच्या नैसर्गिक प्रजननात अडथळे येत असल्याचा अभ्यास अहवाल माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'सेंटर फॉर सेल्युलर ॲण्ड मॉलिक्युलर बायोलॉजी' च्या संशोधनानुसार, सफारी दरम्यान एकाच वाघाभोवती मोठ्या संख्येने पर्यटक वाहने जमा होणे, गोंगाट आणि मानवी हस्तक्षेपामुळे वाघांमधील तणाव संप्रेरके वाढत असून, वाघिणी प्रजननासाठी शांत व निर्जन जागा शोधत जंगलाच्या अंतर्गत भागात सरकत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, व्याघ्र प्रकल्पांच्या अतिसंवेदनशील गाभा आणि बफर क्षेत्रातील वाढत्या मानवी वावरामुळे वाघांच्या दीर्घकालीन प्रजनन चक्रावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, व्याघ्र प्रकल्पांतील या वाढत्या तणावपूर्ण परिस्थितीच्या कारणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने सफारी वाहनांची संख्या मर्यादित करणे, सफारीचा कालावधी कमी करणे आणि प्रजनन क्षेत्राचे विशेष संरक्षण करणे याबाबत पुढे कोणती कार्यवाही व उपायोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच व्याघ्र संवर्धनासाठी उपलब्ध निधी व धोरणांचा प्रभावी उपयोग करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) उपप्रश्नात उल्लेखित असा कोणताही अभ्यास अहवाल विभागास प्राप्त झालेला नाही.

(२) हे खरे नाही. तथापि, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात सुरू असलेले पर्यटन हे NTCA च्या मार्गदर्शक सूचनांनुसार असून, त्यासाठी खालील नियम लागू आहेत :

- व्याघ्र प्रकल्पाकडे नोंदणीकृत वाहनांनाच पर्यटनासाठी प्रवेश मिळतो. इतर वाहनांना प्रवेश प्रतिबंधित आहे.
- प्रत्येक वाहनासोबत नोंदणीकृत गाईड असणे आवश्यक आहे.
- कोअर व बफरच्या प्रत्येक प्रवेशद्वाराची प्रवेश क्षमता निश्चित केलेली असून, त्यापेक्षा अधिक वाहने सोडण्यात येत नाही.
- पर्यटन वाहनाची प्रवेशाची व बाहेर पडण्याची वेळ हंगामानुसार निश्चित केलेल्या आहेत.
- सफारी वाहनाचा वेग २५ कि.मी/तास पेक्षा अधिक नसावा.
- दोन सफारी वाहनामध्ये ५० मीटर अंतर ठेवणे बंधनकारक आहे.
- व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात हॉर्न वाजवणे, ओरडणे, संगीत यावर बंदी आहे.
- सफारी दरम्यान वन्यप्राण्याची छेड काढणे, पाठलाग करणे, जास्त जवळ जाणे, खाऊ घालणे किंवा असा प्रयत्न करणे प्रतिबंधित आहे.

- कोअर व बफर पर्यटन क्षेत्र वेगवेगळ्या झोनमध्ये विभागलेले असून एका झोनमधून दुसऱ्या झोनमध्ये प्रवेश करणे प्रतिबंधित आहे.

वरील सर्व नियमांचे पालन योग्यरितीने होण्यासाठी क्षेत्रीय तपासणी पथक गठीत करण्यात आलेले आहे. तसेच "बधीरा" या GPS ट्रॅकिंग ॲपद्वारे प्रत्येक वाहनांचे सनियंत्रण करण्यात येते. नियमभंग करणाऱ्या पर्यटक/ गाईड/ जिप्सी यांचेवर नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येते.

(३) व (४) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात वाघांची गणना दरवर्षी करण्यात येते. मागील अनेक वर्षांच्या आकडेवारीनुसार वाघांची संख्या वाढत असून कमी झालेली नाही.

तसेच ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील पर्यटनामुळे वाघांच्या प्रजननावर विपरीत परिणाम दिसून आलेला नाही. उपरोक्त प्रकल्पात व्याघ्र संवर्धन धोरणांची प्रभावी अंमलबजावणी केल्याने हा प्रकल्प वाघांसाठी "Source Population" ठरत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्याच्या निविष्ठा व गुणनियंत्रण संचालकांनी प्रयोगशाळा उपकरणे खरेदीत कोट्यवधीचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(२०) * १०४४२ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या कृषी आयुक्तांच्या मान्यतेशिवाय कृषी निविष्ठा व गुणनियंत्रण संचालकांनी आपल्या विभागातील संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्याशी संगनमत करुन कोट्यवधी रुपयांची प्रयोगशाळा उपकरणे खरेदी केली असून, त्यात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याची बाब दिनांक २० फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपकरण खरेदीला शासनाने मंजुरी दिली असली तरी प्रत्यक्ष निविदा प्रक्रियेला कृषी आयुक्तांची अंतिम मान्यता घेण्यात आली नव्हती आणि याच कारणामुळे ही कोट्यावधी रुपयांची अद्ययावत उपकरणे सध्या विनावापर पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी आढळलेले कृषी निविष्ठा व गुणनियंत्रण संचालक तसेच संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे आहे.

(२) राष्ट्रीय कृषी विकास योजनेतर्गत DPR अंतर्गत राज्यातील कीडनाशके उर्वरित अंश तपासणी प्रयोगशाळा बळकटीकरणाच्या प्रस्तावास दिनांक ०८/०१/२०२४ रोजी पार पडलेल्या ३४ व्या SLSC मध्ये मंजुरी मिळाली. त्याबाबत शासन निर्णय दिनांक १४/०२/२०२४ अन्वये रुपये १७९४.२८ लाख रकमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

प्रयोगशाळेस आवश्यक असलेली GCMS-MS (२ नग) या उपकरणांचे निविदा दिनांक २०/०८/२०२५ रोजी Gem प्रणालीवर निविदा मागविण्यात आली.

GCMS-MS उपकरणाच्या खरेदीसाठी Gem प्रणालीद्वारे प्राप्त L1 ला दिनांक ०४/०९/२०२५ रोजी तत्कालीन कृषी उपसंचालक (प्रयोगशाळा) यांनी दिनांक ३१/०८/२०२५ रोजी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्याचे DSC वापरुन दिल्याचे दिसून येते.

तांत्रिक मुल्यमापन केल्यानंतर निविदा उघडणे व त्यानुसार प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता करून L1 निविदा धारकास निविदा समितीची मंजुरी घेणे आवश्यक असताना, या प्रक्रियेचे पालन न करता पुरवठा आदेश दिल्याचे दिसून येतात.

दिनांक ०४/०९/२०२५ रोजी पुरवठा आदेश दिल्यानंतर आयुक्त, कृषी यांची मान्यता घेण्याचे दृष्टीने तांत्रिक समितीची सभा दिनांक ०८/१०/२०२५ रोजी व आर्थिक निविदा समितीची सभा दिनांक १४/१०/२०२५ रोजी घेण्यात येऊन मा.आयुक्त कृषी यांचेकडे L1 निविदा धारकास मान्यता घेण्यासाठी नस्ती दिनांक १४/१०/२०२५ रोजीच्या टिपणीन्वये सादर करण्यात आली. परंतु L1 निविदा धारकास आयुक्त (कृषी) यांनी मान्यता दिलेली नाही.

राष्ट्रीय कृषी विकास योजनेतर्गत कीडनाशक उर्वरित अंश तपासणी प्रयोगशाळा बळकटीकरणासाठी आवश्यक उपकरणांची खरेदीसाठी राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेनुसार L1 पुरवठा धारकास आयुक्त (कृषी) यांची मान्यता न घेता परस्पर दोन नग GCMS-MS या उपकरणाची रक्कम रुपये ४,८५,०९,२१४/- रकमेचे पुरवठा आदेश दिनांक ०४/०९/२०२५ रोजी online Gem प्रणालीद्वारे देण्यात आले. त्यानुसार सदरच्या उपकरणांचा पुरवठा पुणे व नागपूर येथील प्रयोगशाळामध्ये करण्यात आलेला आहे व सद्य:स्थितीत ही उपकरणे विनावापर आहेत. तथापि, सदर देयकांची रक्कम अदा करण्यात आलेली नाही.

(३) प्रयोगशाळा उपकरणे खरेदीतील अनियमिततेबाबत आयुक्त (कृषी) यांनी दक्षता पथकामार्फत तपासणी केली असून सदर प्रकरणी जबाबदार संबंधितांवर कारवाई करण्यात येत आहे.

भविष्यात अशा प्रकारचे गैरव्यवहार टाळून पारदर्शक खरेदी प्रक्रियेबाबत खबरदारी घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. विलास आठवले**
**मुंबई.** **सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.